# १६. आकाशी झेप घे रे

**जगदीश खेबुडकर** (१९३२-२०११) :

प्रसिद्ध कवी, साहित्यिक, गीतकार. पटकथा, संवाद, लघुकथा, नाटक, दूरदर्शन मालिका यांसाठी त्यांनी साहित्य निर्मिती केली आहे. साधे, सोपे परंतु अर्थगर्भ व नादमय शब्द ही त्यांच्या गीतांची वैशिष्ट्ये होत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना अकरा वेळा सन्मानित करण्यात आले आहे. त्याशिवाय गदिमा पुरस्कार, कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. मराठी चित्रपटसृष्टीसाठी त्यांनी मोठ्या प्रमाणावर गीतांचे लेखन केले आहे.

कवीने सुरक्षिततेचे, परावलंबित्वाचे कवच काढून टाकून स्वकष्टाने जगण्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. आपल्या क्षमतांवर, सामर्थ्यावर विश्वास ठेवावा. कवी पाखराच्या प्रतीकातून माणसाला स्वसामर्थ्याची ओळख करून देतात. प्रस्तुत कवितेतून कवी परावलंबित्वाचे कवच फोडून स्वसामर्थ्यावर ध्येयाची उंच शिखरे पादाक्रांत करा, उत्तम यश मिळवून त्याचा निखळ आनंद घ्या, असा संदेश देतात.

आकाशी झेप घे रे पाखरा
सोडी सोन्याचा पिंजरा

तुजभवती वैभव, माया
फळ रसाळ मिळते खाया
सुखलोलुप झाली काया
हा कुठवर वेड्या घेसी आसरा

तुज पंख दिले देवाने
कर विहार सामर्थ्याने
दरि-डोंगर, हिरवी राने
जा ओलांडुनी या सरिता-सागरा

कष्टाविण फळ ना मिळते
तुज कळते परि ना वळते
हृदयात व्यथा ही जळते
का जीव बिचारा होई बावरा

घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले
घर प्रसन्नतेने नटले
हा योग जीवनी आला साजिरा



## कृती

### (१) योग्य पर्याय ओळखा.

(अ) सुखलोलुप झाली काया म्हणजे········

(१) सुखाचा तिरस्कार वाटतो.

(२) सुखाबद्‌दल प्रेम वाटते.

(३) सुखाचे आकर्षण वाटते.

(४) सुख उपभोगण्याची सवय लागते.

(आ) पिंजरा सोडून झेप घेतल्याने ········

(१) काया सुखलोलुप होते.

(२) पाखराला आनंद होतो.

(३) आपल्याला स्वसामर्थ्याची जाणीव होते.

(४) आकाशाची प्राप्ती होते.

### (२) तुलना करा.

| पिंजऱ्यातील पोपट | पिंजऱ्याबाहेरील पोपट |
|---|---|
| | |
| | |
| | |

### (३) पाखराला स्वसामर्थ्याची ओळख करून देणाऱ्या कवितेतील ओळी शोधून लिहा.

### (४) कवीने यशप्राप्तीच्या संदर्भात सांगितलेली सुवचने लिहा.

### (५) काव्यसौंदर्य.

(अ) खालील ओळींचे रसग्रहण करा.

‘घामातुन मोती फुलले
श्रमदेव घरी अवतरले’

(आ) ‘आकाशी झेप घे रे पाखरा सोडी सोन्याचा पिंजरा’, या ओळीतील मथितार्थ स्पष्ट करा.

(इ) ‘स्वसामर्थ्याची जाणीव’ हा उत्तम व्यक्तिमत्त्व विकासाचा पाया आहे, हे विधान स्पष्ट करा.

(ई) ‘घर प्रसन्नतेने नटले’, याची प्रचिती देणारा तुमचा अनुभव लिहा.

**उपक्रम :**

कवी दत्त यांची ‘पिंजऱ्यातील पोपट’ ही कविता मिळवा. ‘पिंजऱ्यातील पोपट’ व ‘आकाशी झेप घे रे’ या दोन्ही कवितांच्या भावार्थातील साम्य शोधा.

DD2EUC